# विजयदुर्ग



आदित्य गुरव

# विजयदुर्ग

आदित्य गुरव

ई साहित्य प्रतिष्ठान

# विजयदुर्ग


## लेखक: आदित्य गुरव

८१६९९२६५८६/९९२०४९८०५३

aaditya.gurav2014@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान®

esahity@gmail.com

www.esahity.com

Published : 21 October 2017



©esahity Pratishthan® 2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

• या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा एकांकिका, नाटक. सिनेमा. सिरियल. स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

नमस्कार!

हरिहरगड या माझ्या पहिल्या पुस्तकानंतर बऱ्याच वेळानंतर हे पुस्तक लिहिता आले. पहिल्या पुस्तकाच्या सर्व प्रतिक्रियाकर्त्यांचे आभार!

विजयदुर्गावरील सदर पुस्तक लिहिताना त्या मार्गावरील कोकणातील इतर प्राचीन आणि ऐतिहासिक शिवमंदिरांचा उल्लेख टाळणे शक्य नव्हते. प्रवास जसा केला, त्याच क्रमाने लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकावरील प्रतिक्रियांची वाट पहात आहे.

कळावे,

- आदित्य गुरव.

८१६९९२६५८६/९९२०४९८०५३

aaditya.gurav2014@gmail.com

**अर्पण:**

माझ्या प्रवासात

नेहमी माझ्या पाठीशी असणाऱ्या

माझ्या परिवाराला

आणि माझ्या सोबत असणाऱ्या माझ्या मित्रपरिवाराला

सप्रेम अर्पण.

आदित्य

"काही नाही रे; नेहमीचं आहे ह्या लोकांचं.  पण तू आणि मी नक्की जाऊया. "मी काकाला लाडीगोडी लावत म्हटलं.

काकाचा अनुभव -"अरे येतील रे, आपण बाहेर पडलो उद्या की नक्की येतील स्वतःहून. "



ह्यावेळच्या उन्हाळयात पाडव्यासाठी गावी जाता आलं आणि मला ह्यावेळी काही करून विजयदुर्ग पाहायचाच होता. त्याची तयारी आधीपासून-पार मुंबईहून- मी केली होती. इंटरनेट, पुस्तकं, इ.

शाळेच्या पुस्तकात किंवा गुढीपाडव्याच्या जाहिरातीतील फोटोंमध्ये दिसणारी गुढी आणि गावच्या गुढीमध्ये शब्दशः जमीन-अस्मानाचा फरक आहे.

दुसऱ्या दिवशी आम्हा दोघांच्या आधी आईबाबा आणि आजीआजोबा अगदी तय्यार! आजीची कोणत्याही किल्ल्याला भेट देण्याची ही पहिलीच वेळ!

# कुणकेश्वर




कुणकेश्वर गाव सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात समुद्रकिनारी वसले आहे. कुणकेश्वरला दक्षिण कोकणाची काशी म्हटले जाते. देवगडच्या दक्षिणेस २० किलोमीटरवर कुणकेश्वर आहे. श्रीदेव कुणकेश्वर हे एक शिवमंदिर असून छत्रपती शिवरायांनी ह्या मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. मंदिर जवळ येताच समुद्राच्या प्राश्वभूमीवर प्रथम दर्शन होते ते कळसाचे. जवळ जाता जाता लाटांचा आवाज वाढू लागतो.



कुणकेश्वर मंदिराला अगदी साजेसा असा सुंदर समुद्रकिनारा लाभला आहे. किनाऱ्यावरील दगडांवर सुमारे १०० शिवलिंगे कोरलेली आहेत. गेली कित्येक वर्षे समुद्राच्या पाण्यामध्ये असणारी ही शिवलिंगे झीज होत असतानासूद्धा बऱ्याच प्रमाणात अस्तित्व टिकवून आहेत. खासकरून ओहोटीच्या वेळेस समुद्राचे पाणी मागे गेल्यावर मोठ्या प्रमाणावर शिवलिंगे पाहायला मिळतात.





कोकणाला लाभलेल्या नितांत सुंदर आणि स्वच्छ समुद्रकिनाऱ्यांपैकी कुणकेश्वर एक. किनाऱ्याजवळचे समुद्राचे पाणी नदीच्या पाण्याला लाजवेल इतके नितळ! देवालयाच्या दक्षिणेस समुद्राच्या अगदी निकट असूनही पिण्यायोग्य पाण्याचा पुरातन बांधणीचा एक तलाव आहे.





दरवर्षी कुणकेश्वरला महाशिवरात्रीच्या निमित्ताने तीन दिवसांची यात्रा भरते. कोकणातील प्रत्येक मंदिरात आपल्याला आढळणारे तरंग म्हणजेच देवाचे खांब. ह्या तरंगांनाच देवाचे अंश मानून भक्तगण आपापल्या गावाचे हे देव घेऊन कुणकेश्वराच्या भेटीला येतात. ह्या प्रसंगी हे वजनदार आणि उंचच उंच तरंग विशेष सजवून मिरवत आणले जातात. मानकरी मंडळी हे तरंग हाताखांद्यावरून तसेच अनवाणी पायांनी घेऊन येतात.

देवस्थानचे क्षेत्रफळ सुमारे पाऊण एकरात विस्तारलेले आहे गाभाऱ्याचे शिखर बरेच उंच असून बदामी आकाराचे बांधलेले आहे. मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिराचे बदामी शिखर सध्या बांधले असले तरीही काही प्रमाणात कुणकेश्वर मंदिराशी मिळतेजुळते आहे.  कोकणात मिळणाऱ्या जांभ्या दगडाचा उपयोग बांधणीसाठी केला असून मंदिराचा जिर्णोद्धार करताना कलात्मकतेपेक्षा मजबुतीकडे अधिक लक्ष दिलेले दिसून येते. वारंवार झालेल्या जिर्णोद्धारामुळे मंदिराच्या मूळ स्वरुपात कालानुरुप बदल होत गेल्याचे स्पष्ट दिसते.

छत्रपती शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळापैकी एक असणाऱ्या नारो निळकंठ अमात्य यांच्या अधिपत्याखाली विजयदुर्गपासूनचा सागरी प्रदेश होता. मुख्य मंदिराच्या दक्षिण प्रवेशद्वारासमोर एक मोठे तुळशी वृंदावन आहे. हे नारो निळकंठ यांचे समाधीस्थान.

प्रथमदर्शनी मंदिराचे बांधकाम हे दाक्षिणात्य पद्धतीचे वाटते. मंदिराचा पाया ग्रॅनाईट दगडाने बनविला आहे. श्री कुणकेश्वर मंदिराचे सर्व आवार घडीव चिरेबंदी असून दुहेरी तटबंदीने मंदिर भक्कम केले आहे. मंदिराच्या समोरच मोठा नंदी आहे. पाच मोठ्या दीपमाळा आहेत. मंदिराच्या कळसापर्यँतचे बांधकाम तारकाकृती आहे. मंदिराचा चौथराच 30 फूट उंचीचा आहे. मंदिर सुमारे ७० फूट उंच असून घडीव दगडांनी साकारले आहे. मंदिराच्या कळसाकडे पोहोचण्या आधीच त्यातील शिल्पप्रकारांनी सौंदर्याचा कळस गाठला आहे. विशेष उल्लेख करावा लागेल तो महाराष्ट्रात जवळजवळ दुर्मिळ असणाऱ्या गंडभेरुडाच्या शिल्पाचा. मंदिररचना वैदिक पद्धतीची असल्याने विमान, अंतराळ, अर्धमंडप, सभामंडप पाहावयास मिळतात.



देवळात अप्रतिम कोरीव काम आहे. जय-विजय, दशावतार, गरुड, व्याळ, हनुमान, शेषशायी विष्णु, सर्प, देवतांच्या मूर्ती मुख्य मंदिराला व्यापून आहेत.मंदिराच्या परिसरात सुरक्षेसाठी ठेवलेली एक तोफही होती.श्रीनारायण मंदिरातील नारायणाची मूर्ती ही अत्यंत दुर्मिळ असून तिच्या प्रभावळीत दशावतार कोरलेले आहेत.

मंदिराच्या जवळच असलेल्या चौथऱ्यावर एक उंच लाकडी स्तंभ उभा केलेला आहे. याला 'ढालकाठी' असे म्हणतात. कुणकेश्वर मंदीराच्या पूर्वेला डोंगर उतारावर १९२० साली करण्यात आलेल्या खोदकामात प्राचीन गुहा सापडली. सदर गुहा चांदेलवाडीतील पावणाई मंदीराजवळ असून मुख्य मंदिरापासून अलग असल्याने कमी लोकांना याची माहिती आहे.तिचे प्रवेशद्वार २.५ फूट रुंद व ४ फूट उंच आहे. गुहा सुमारे १० x१२ फुटाची आहे. सदर गुहा जांभ्या दगडात कोरलेली असून गुहेत पुरातन लेणी आहेत. गुहेत नंदी, शिवलिंग, स्त्री-पुरुषांचे मुखवटे आहेत. गुहेत एक भुयार असून सध्या त्यात प्रवेश करता येत नाही.

दंतकथांनी झाकोळलेला देवस्थानाचा खरा इतिहास, त्याचे ऐतिहासिक महत्व,मंदिराचा प्राचीनकाळचा विस्तीर्ण परिसर आणि  सद्यस्थितीत विखुरले गेलेले अवशेष ह्यांची श्री कुणकेश्वराशी एकसंधपणे सांगड  घातल्यास ह्या पुराणपुरुषाचे अस्तित्व अजून उजळून निघेल.



## विमलेश्वर मंदिर- लेणे





देवगड तालुक्यात वाडा गावाजवळ विमलेश्वर हे पुरातन शिवमंदिर असून गर्द वनराईत ओढ्याच्या काठी भव्य अखंड जांभ्या खडकात कोरले आहे. खरे पाहता ते केवळ मंदिर नसून मंदिर-लेणे आहे. सुमारे ४०x ४०x २० फूट आकारात दोन भागांत हे मंदिर कोरले आहे. आतमध्ये साधारण १२x १२x ८ फुटाचा भाग जमिनीपासून उंचावर कोरलेला आहे.




गाभाऱ्यात विमलेश्वराची पिंडी साळुंकीसह आहे. गाभारा अगदी शांत-निवांत. अंधार आणि थंडगार अगदी बांधीव गुहेसारखा. गाभाऱ्यात जाताना एखाद्या गुहामंदिराचा भास होतो.





मंदिराचे गर्भगृह जमिनीपासून  उंचावर  असून शंकराची  पिंडी भलीमोठी आहे.

पावसाळयात पाण्याच्या सान्निध्यामुळे मंदिर परिसर अधिक खुलून दिसत असला तरी झऱ्याला बारमाही पाणी असते. गाभाऱ्यात दिव्यांचा लखलखाट टाळला आहे.मंदिराच्या प्रवेशद्वारावर काही मूर्ती आणि दोन अजस्त्र हत्ती कोरलेले आहेत. मंडपाच्या छताला वटवाघुळासदृश्य सजीव लटकलेले दिसून येतात. इथल्या शांततेचा हा अजून एक सबळ पुरावा समजता येईल.

परिसरातील स्वच्छता चटकन नजरेत भरते. कचरा तो केवळ झाडाच्या पाचोळयाचा.





मोठ्या संख्येत वीरगळी इथे पाहायला मिळतात. समीकरण अगदी सोप्पंय. जितक्या अधिक वीरगळी तितके मंदिर महत्वाचे. त्याचा संघर्ष महत्वाचा आणि त्याचा इतिहासही.

वीरगळी बरेचदा दुर्बोध म्हणून दुर्लक्षित केल्या जातात. त्याहूनही वाईट म्हणजे त्यावर रंगकाम केले जाते किंवा त्या विसर्जित केल्या जातात. इतिहासाच्या ह्या महत्वाच्या साक्षीदारांची हत्या आपण थांबवायलाच हवी.



मंदिर परिसर अगदी नयनरम्य. रस्त्याने जाताना मंदिर लगेच नजरेस पडत नाही; कारण ते जमिनीपासून खालच्या भागात आहे. रस्त्याच्या उजव्या हाताला दिसणारी कमान  आपले  लक्ष वेधते. कोकणातील ठिकाणांचं हे एक वैशिष्ट्य म्हटलं पाहिजे. ती तुम्हाला आपल्यापर्यंत घेऊन येत नाहीत, तुम्हाला त्यांच्या पर्यंत त्यांना शोधात जावे लागते. इतकी सुंदर स्थळे असूनही ती अगदी अल्पस्पर्शित. कोकण अजूनही सुस्थितीत असण्यामागे हे अजून एक कारण!

# रामेश्वर मंदिर- गिर्ये




विजयदुर्गच्या २ किमी अलीकडे असलेल्या गिर्ये गावात पेशवेकालीन प्राचीन रामेश्वर मंदिर आहे. मंदिर मुख्य रस्त्यावर नसून थोड्या आडवाटेवर आहे. मंदिरासमोर जहाजाची डोलकाठी आहे.  दर्शनी प्रवेशद्वार उंच असून सदर मंदिरसुद्धा विमलेश्वर मंदिराप्रमाणेच मुख्य जमिनीपासून बरेच खाली आहे.

पूर्वी मंदिरासमोर असणाऱ्या २ तोफांपैकी सध्या एकच शिल्लक आहे. सुमारे १००-१५० मी. चा मार्ग २० मी. खाली असणाऱ्या मंदिरापर्यंत खडक खोदून तयार केला आहे. दिवे लावण्यासाठी खडकात दुतर्फा खोबण्या केलेल्या आहेत. मंदिरासमोरील दीपमाळा अस्सल कोकणी पद्धतीच्या आणि आधीच्या मंदिरांशी साधर्म्य असणाऱ्या. मंदिराचे छत कौलारू असून मंदिरात अप्रतिम लाकडी बांधकाम पाहायला मिळते.



मंदिर सुमारे ३०० वर्षे पुरातन असून त्याचे बांधकाम सवाई माधवराव पेशव्यांचे सुभेदार गंगाधरपंत भानू ह्यांनी केले. आनंदराव धुळपांनी प्रवेशद्वार उभारले. रामेश्वर मंदिर प्राचीन असल्याने शिवमंदिराची वैशिष्ट्ये जागोजागी पाहावयास मिळतात.





कोकणात शिवमंदिरे अधिक आहेत. महाशिवरात्रीला मोठा उत्सव साजरा करण्यात येतो पण पेशवेकाळात जेव्हा शेकडो दिव्यांनी दुतर्फा मंदिर परिसर उजळून निघत असेल, काय बहार येत असेल! सध्या आस्तित्वात असलेले दर्शनी प्रवेशदार कितीही उंच किंवा भव्य असले तरी ते पुरातन शिवमंदिराशी पूर्णतः विसंगत वाटते.



कोकणातील अनेक देवस्थानांना पेशवे आणि मराठा सरदारांनी इंग्रज-पोर्तुगीजांशी लढताना  जिंकलेल्या जहाजांवरील घंटा अर्पण केल्या आहेत. मुख्य मंदिरालगतच्या प्रवेशद्वारावर धुळपांनी घंटा अर्पण केली आहे. अधिक बारकाईने पाहिल्यास घंटेवरील साल स्पष्ट दिसते-१७९१. सरदार धुळपांचा वाडा इथून जवळच आहे.



कोकणातील विविध प्रांतात सदर प्रांताच्या मुख्य पुजाऱ्यांनीही स्वतःहून अशा काही घंटा देवस्थानांना अर्पण केल्या आहेत.





सध्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरु आहे. मंदिर परिसर फरसबंदी असून  बांधकाम किल्ल्यासदृश्य आहे . संभाजी आंग्रे ह्यांची समाधी तसेच पेशवेकालीन विहीरही आहे. कोकणात फारशी न सापडणारी मंदिराच्या बाह्यभागावरील प्राचीन भित्तिचित्रे रामेश्वर मंदिराला लाभली आहेत. काळाच्या ओघात ती नष्ट होण्याच्या मार्गावर असून जीर्णोद्धारात त्यांना अग्रस्थान दिले गेले आहे.





मंदिरातील लाकडी खांब हे कलाकुसरीने अतिशय समृद्ध असून डोळयांचे पारणे फेडतात. मंदिरातील रंगकाम आणि नक्षीकामही पाहण्याजोगे. इतर मंदिरांप्रमाणेच ह्या मंदिराबाबतही अनेक दंतकथा प्रचलित असून प्राचीन काळातील मंदिराचे वैभव त्या अधोरेखित करतात.



इतकी एकापेक्षा एक ठिकाणं पाहिल्यामुळे थोडा वेळ आम्हाला विजयदुर्गाचं विस्मरण झालं .पण रामेश्वर मंदिरातून निघताच आम्ही दुर्ग गाठला. वाटेत उजवीकडे समुद्र आपल्याला साथ करतो तर कधीकधी  मोठमोठाली मालवाहू जहाजे समुद्रात पाहता येतात.

# विजयदुर्ग





दुर्ग प्रकार : जलदुर्ग

जिल्हा : सिंधुदुर्ग

श्रेणी : सोपी

तीन बाजूंनी समुद्राने घेरलेला "विजयदुर्ग" घेरिया नावाने पूर्वी प्रसिद्ध होता.वाघोटन नदी समुद्राला ह्या ठिकाणी मिळते. १२ व्या शतकापासून शिलाहार,यादव, विजयनगर, बहामनी, आदिलशाही राजवटी पाहिलेला हा किल्ला १७ व्या शतकात मराठ्यांच्या आरमाराचे प्रमुख केंद्र होता.

विजयदुर्गच्या पश्चिमेला समुद्राखाली बांधलेली संरक्षक भिंत हे एक आश्चर्य आहे आणि आजही अस्तित्व टिकवून आहे.



गडाचा इतिहास आपल्याला सुमारे हजार वर्षे मागे घेऊन जातो. कोल्हापूरचा शिलाहार राजा भोज याने इ.स. ११९३ ते इ.स.१२०६ ह्या काळात हा किल्ला बांधला. १२१८ मध्ये देवगिरीच्या यादवांकडे तर १३५४ मध्ये विजयनगरच्या राजाकडे गड आला. शिवाजीमहाराजांनी किल्ला जिंकून घेतला.त्या वेळी विजयनाम संवत्सर चालू होते म्हणून ह्या संवत्सराच्या नावावरून किल्ल्याचे नाव त्यांनी विजयदुर्ग ठेवले.

गडाचा इतिहास अनेक युद्धप्रसंगांनी ओतप्रोत भरला आहे. कान्होजी आंग्रे,तुळाजी आंग्रे, संभाजी आंग्रे, आनंदराव धुळप हे किल्ल्याचे किल्लेदार होते. इ.स. १७१८ मध्ये इंग्रजांनी प्रचंड आरमारानीशी हल्ला चढवला परंतु रुद्राजी धुळपच्या नेतृत्वात मराठ्यांनी केलेल्या तीव्र प्रतिकाराने प्रचंड दारूगोळा आणि सुमारे २०० सैनिकांचे प्राण गमावून ब्रिटीश मुंबईला परतले. ब्रिटीश नौदलासाठी हा एक मानहानीकारक पराभव ठरला होता. मराठा आरमाराची दहशत इतकी होती की अनेकदा शत्रू पराभूत झाल्यावर आपली जहाजे मराठ्यांच्या हाती लागू नयेत ह्यासाठी चक्क पेटवून देत.

इ.स. १७५६ मधे तुळाजी आंग्रेंविरुध्द पेशवे आणि इंग्रजांनी संयुक्त आघाडी उघडली. पेशव्यांनी जमिनीवरून व इंग्रजांनी पाण्यावरून हल्ला केला. युद्धात आंग्र्यांना हार पत्करावी लागली. १८१८ साली पेशवाईच्या अस्तासोबतच महाराष्ट्रातील तमाम गडकिल्ल्यांप्रमाणे विजयदुर्ग ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली आला.



पूर्वीच्या काळी गडाला गावाकडच्या बाजूने खंदक होता.  समुद्राच्या

पाण्याने खंदक भरून गडाला अलिप्त ठेवता येई. प्रवेशासाठी उचलता येण्याजोग्या लाकडी पुलाची व्यवस्था होती. सध्याच्या घडीला भराव घातल्यामुळे आपला थेट गडावर प्रवेश होतो. शिवकाळातील काही मोजक्याच गडांना मिळालेली राजधानीच्या पात्रतेची कित्येक वैशिष्ट्ये विजयदुर्ग बाळगून आहे.



गडावरचे मुळचे हनुमान मंदिर शिवाजी महाराजांनी बांधले होते. मोठ्या तोफा उभ्या करण्यासाठी ताटाला फंज्या केल्या आहेत. त्यांच्यासाठी खास उतार तयार केला आहे. जागोजागी जंग्या आहेत. किल्ल्याच्या भिंतींवर तोफांच्या गोळयांच्या खुणा आजही पाहायला मिळतात. किल्ल्यावरील पाणी साचून न राहता ते समुद्रात सोडण्याची व्यवस्था आहे.



आतील भागात शंकर व भवानी मातेच्या देवालयाचे अवशेष सापडतात. राजधानीच्या ठिकाणीं दिसणारी खलबतखान्याची वास्तूही पाहायला मिळते. गडाचा पहिला दरवाजा "हनुमंतदरवाजा" म्हणून ओळखला जातो. पुढे जिबीच्या दरवाजातून आत शिरल्यावर किल्ल्याच्या पडकोटाला असलेल्या तीन तटबंद्या पाहायला मिळतात.

किल्ल्याचे महाद्वार मजबूत असून त्याच्या पूर्वेकडील तट वळवून लपवल्याप्रमाणे बांधून काढला आहे. त्यामुळे महाद्वार बाहेरून दिसत नाही. महाद्वाराच्या माथ्यावर नगारखाना आहे.





शिवाजी महाराजांनी उभी केलेली समुद्रालगत असलेली पहिली तटबंदी ३० फ़ूट उंचीची आहे. दुसरी तटबंदी १० फ़ूट उंचीची आणि तिसरी तटबंदी ३० फ़ूट उंच आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या तटबंदीच्या मधून पुढे गेल्यावर गोमुखी रचनेचे "यशवंत" महाव्दार लागते. तीन दरवाजे, तिहेरी तटबंदी ह्यांच्या सहाय्याने किल्ला अभेद्य केलेला आहे. गडाचे एकूण क्षेत्रफळ १७ एकर १९ गुंठे आहे.





किल्ल्यात प्रवेश केला तर पोलिस चौकीसमोर तोफगोळे रचून ठेवलेले! महाराष्ट्रात असे कित्येक गड आहेत ज्यांच्याकडे आज इतिहासशिल्पे म्हणून दाखवण्यासाठी काहीच नाही आणि इथे म्हणाल तर तोफा आणि तोफगोळयांची रांगोळीच मांडून ठेवलेली दिसते. भारताचा विचार करता महाराष्ट्रात अनेक ऐतिहासिक ठिकाणी आपल्याला तोफा पाहायला मिळतात. पण अनेकदा त्या जमिनीत गाडून त्यांचा केलेला अघोरी बंदोबस्त पाहवत नाही! डाव्या बाजुने प्रथम आपल्याला खलबतखान्याची इमारत दिसते. पुढे सदरेची भव्य इमारत दिसते. सदरेच्या पुढे एक चुन्याचा घाणा पाहायला मिळतो. पुढे बुरुजावरच बांधलेल्या दोन मजली माड्या पाहायला मिळतात. पेशवेकाळात तसेच पोर्तुगीजांच्या सद्दीत ह्या माड्या स्वरूपातील इमारतींना विशेष महत्व प्राप्त झाले होते.





राणीवसाची इमारत सुरक्षित अशा बुरुजावर बांधलेली पाहायला मिळते. पुढे तटबंदीवर चढून चालायला सुरुवात केल्यावर गणेश, राम, हणमंत, दर्या, तुटका, सिव्हरा, सिंदे, ई. बुरुज पाहायला मिळतात. ह्या बुरुजांच्या पुढेच समुद्रात बांधलेली भिंत आहे.







दर्या बुरुजाला असलेल्या पायऱ्यांवरुन खाली उतरल्यावर एक नालाकृती विहीर पाहायला मिळते.विहीर तर विशेषच. एकीकडे खारा समुद्र तर भिंतीच्या लगतच्या दुसऱ्या बाजूस किल्ल्यात गोड्या पाण्याची विहीर! आश्चर्य!! त्याच्या पुढे एक चुन्याचा घाणा आहे.

मनरंजन बुरुजावरून गोविंद बुरुजाकडे जाताना उजव्या बाजूला असलेल्या किल्ल्याच्या मुख्य तटबंदीत एक चोरदरवाजा पाहायला मिळतो; अर्थात शोधावा लागतो.



मुळातच छुपे असणारे दरवाजे अंगावर वाढलेल्या झाडाझुडपांमुळे अगदी दिसेनासे होतात. पूर्वीच्या काळी जमिनीपासून तुटलेल्या अवस्थेत असूनदेखील गडावरील चोर दरवाजे तसेच भुयारांमुळे गडाचे गूढ वाढत जाते.

सद्यस्थितीत गडावर काही ठिकाणी डागडुजीचे काम चालू आहे.



किल्ल्याच्या बांधकामासाठी वापरलेला दगडही काहीसा मोठा आणि वजनदार! भोज, यादव आणि अगदी मुघल काळातील किल्ले आपल्या स्थापत्यातील सौंदर्यासाठी ओळखले जातात. मराठ्यांच्या अमदानीत मात्र वास्तूच्या मजबुतीकडे अधिक लक्ष पुरवण्यात आले आहे.





गोविंद बुरुजावरून पुढे गेल्यावर एका भव्य बुरुजापाशी आपण येतो. हाच "खुबलढा किंवा बारातोपा बुरुज". हा बुरुज काहीसा आडवळणाचा आणि म्हणूनच महत्वाचा!



या बुरुजावर जाण्यासाठी तटबंदीच्या आत बोगदा आहे. बोगद्यातून बाहेर पडल्यावर आपण समुद्राच्या अजून जवळ पोहोचतो.खुबलढा बुरुजाचे एकंदर मोक्याचे स्थान आणि आवाका पाहता शत्रूला चकवून त्यावर पाठीमागून हल्ला करण्यासाठी त्याचा वापर होत असावा. पुढे गेल्यावर घनची बुरुज आहे. पुढे जी वास्तू पाहायला मिळते, त्यावर दारुकोठार असे नाव लिहिलेले आहे; परंतू तटबंदीला लागुनच दारुकोठार असण्याची शक्यता कमी आहे.

किल्ल्याच्या माथ्यावर पोहोचण्यासाठी सध्या पायऱ्या अस्तित्वात नाहीत. ह्या भागाला निशाण टेकडी म्हणतात.  किल्ल्याचा मध्यभाग सध्या अस्तित्वात नाही. दुभत्या जनावरांसाठी ते एक लांबच लांब कुरण बनले आहे.

किल्ल्यातील छोटेखानी टेकडीभोवती असलेल्या तटबंदीच्या आत प्रवेश केल्यावर एक विहीर पाहायला मिळते. त्यापुढे भवानी मंदिर पाहायला मिळते. पुढे उध्वस्त वास्तुंचे काही चौथरे पाहायला मिळतात. मेवाड-राजस्थानप्रमाणे महाराष्ट्रातल्या एकाही किल्ल्याला ते गतवैभव राखता आले नाही. पण आमच्या इतिहासाचे भग्नावशेष ज्या मानाने आज जगासमोर उभे आहेत तो मान, आत्मसन्मान ह्यांची

तुलना कोणत्याही वैभवाशी शक्य नाही! मांडलिकत्वाचा मुलामा ह्या वस्तूंनी कधीही स्वीकारला नाही.

वाटेत उजवीकडे असलेल्या सिमेंटच्या ओट्यांना "साहेबांचे ओटे अगर कट्टे" म्हणतात. इ.स. १८७८ मधे खग्रास सूर्यग्रहणाच्यावेळी ब्रिटीश शास्त्रज्ञ लॉकियर ह्याने सूर्याचे निरीक्षण करण्यासाठी विजयदुर्गावर खास चौथरे बनवून घेतले. त्यावेळी त्याला हेलियम वायूचा शोध लागला असे मानले जाते. हेलीऑस म्हणजे सूर्य आणि हेलियम म्हणजे सूर्यावर आढळणारे.



गडफेरीत डावीकडे एक लहान व एक मोठा हौद पाहायला मिळतो. मोठ्या हौदात उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. ह्या हौदांना स्वतःचे झरे नसून ते पावसाचे पाणी साठवण्यासाठी असावेत.पुढे जखिणीचे मंदिर व त्यासमोर ठेवलेली जखिणीची तोफ़ पाहायला मिळते. पुढे उभी असलेली वास्तू पूर्वीच्या काळचे धान्य कोठार असावे. तोफांच्या माऱ्याच्या कित्येक खुणा आजही हा गड जपून आहे. किल्ल्याच्या दगडावरील मोठाले पांढरे डाग म्हणजे तोफगोळयांचा खुणा आहेत.



पुन्हा पोलिस चौकीकडे येताना वाटेत घोड्यांच्या पागा, हौद, एक विहिर आणि तुळशीवृंदावन पाहायला मिळते. इथला हौद आणि तुळशीवृंदावन खास पेशव्यांच्या स्थापत्याची आठवण करून देणारा.



इथेच तटबंदीच्या पायऱ्यांजवळ एक भूयार असून हे दारूकोठार असण्याची शक्यता आहे. किल्ल्याच्या गोमुखी दरवाजाजवळ आल्यावर आपली गडफ़ेरी पूर्ण होते. गडफ़ेरी पूर्ण करण्यासाठी २ तास लागतात. मात्र गड एका फेरीत कवेत येत नाही. एकदा पाहून समाधानही होत नाही.

विजयदुर्गपासून ७ किमी अंतरावर गिर्येगाव आहे. गावात बसस्थानकामागे आनंदराव धुळपांचा वाडा आहे. गडापासून धुळूप वाड्यापर्यंत एक भुयारी मार्ग जात असल्याची वदंता ऐकिवात आहे. तसे असल्यास ते एक फार मोठे पर्यटन आकर्षण केंद्र ठरेल.

युरोपातील जिब्राल्टच्या किल्ल्याप्रमाणे अभेद्य आणि अजिंक्य आहे म्हणून विजयदुर्गाला पूर्वेचा जिब्राल्टर म्हणून ओळखतात. विजयदुर्ग हे एक उत्कृष्ट बंदर आहे.



छत्रपती शिवाजीमहाराजांनी विजापूरच्या आदिलशहाकडून विजयदुर्ग जिंकून घेतला आणि पूर्वी केवळ ५ एकर असणाऱ्या दुर्गाचे क्षेत्रफळ १७ एकर पर्यंत वाढविले.

महाराजांनी दुर्ग जिंकल्यावर त्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला, दुर्ग अजून मजबूत आणि अभेद्य बनवला. वाघोटन खाडीत उलट्या व्ही आकाराची भिंत पाण्याखाली आहे. ३००-३५० फूट लांब, २०-२२ फूट रुंद, १५ फूट उंच. मात्र ती ओहोटीच्या वेळेसही दिसत नाही. ४० किलोमीटर लांब असलेली वाघोटन खाडी हे या किल्ल्याचे बलस्थान आहे. कारण शत्रूची मोठी जहाजे खाडीच्या उथळ पाण्यात येऊ शकत नसत. किल्ल्याजवळ मोठी जहाजे-युध्दनौका आल्यास त्यांचा तळ भिंतीला आपटून ती नष्ट होत असत.



गडबांधणीसाठी त्याकाळी सुमारे अडीच लाख खर्च आला. महाराजांनी तटावर २१ बुलंद बुरुजांची रांगच उभी केली. हत्ती-घोडे ह्यांच्या पागा, नवे वाडे, लष्करासाठी वाडे बांधले.

कान्होजी आंग्रेंच्या आरमाराची बहुतेक सर्व जहाजे विजयदुर्ग इथेच सुरक्षित ठेवली जात. किल्ल्यात पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे असे दोन भुयारी मार्ग आहेत. विजयदुर्ग किल्ल्याचे दर्शन आपल्याला  ह्यापूर्वी राष्ट्रीय पारितोषिक विजेता मराठी चित्रपट “किल्ला” मधूनही झाले आहे.

विजयदुर्गापासून ३ कि.मी. अंतरावर वाघोटन खाडीत गिर्ये इथे खडक खोदून आरमारी गोदी बांधली होती. त्यात जहाज बांधणीचा मोठा कारखाना उभारला होता.


खटकणारीं गोष्ट म्हणजे पर्यटक इथे आले तरी गडाचा सविस्तर इतिहास जाणणारे अगदीच विरळ.  त्यामुळे काहींच्या बाबत हा दुर्ग केवळ फोटोग्राफीचं ठिकाण बनतो तर काहींसाठी पिकनिकचा अड्डा. शालेय सहलींचे तर हे हक्काचे ठिकाण, पण विद्यार्थ्यांना किल्ल्याची माहिती देण्यासाठी विशेष काही व्यवस्था नाही. सध्या गावचा बाजार जिथे भरतो ती किल्ल्यालगतची जागा प्रथमदर्शनी तरी किल्ल्याचाच एक भाग वाटते.

हा किल्ला मुंबईच्या दक्षिणेस सुमारे २२५ किलोमीटरवर व गोव्याच्या उत्तरेस १५० किलोमीटरवर आहे.


मुंबई – गोवा महामार्गावर मुंबईपासून ४७१ किमीवर असलेल्या तळेरे फ़ाटा येथून विजयदुर्ग ५५ किमीवर आहे. कोकण रेल्वेचे वैभववाडी स्थानक विजयदुर्गपासून ६७ किमीवर आहे.

परतीच्या प्रवासात गाडी मी चालविल्याने आम्हाला माघारी पोहोचण्यास बराच उशीर झाला पण कोणाचेच त्याकडे तितकेसे लक्ष नव्हते.

काका-"पुढल्या वेळेस जरा मोठी सुट्टी घेऊन ये रे; सिंधुदुर्गला जाऊ आपण. "





कुणकेश्वर ते विमलेश्वर




विमलेश्वर ते रामेश्वर

रामेश्वर ते विजयदुर्ग




ऋणनिर्देश

नकाशा: trekkshitij, google

छायाचित्रे : आदित्य गुरव.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यांच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे

मार्केटिंग करा. एकदम फ्रंट फुटवर येऊन खेळू. जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahitya.com

esahity@gmail.com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे. ई साहित्यचं App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ्री वाचा.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service सुरू झाली आहे. पूर्णपणे फुक्कट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट. कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सऍप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा. आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक Whats app द्वारे पाठवले जाईल. आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवा. त्यांना आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू. व आपल्याला VIP सभासद बनवले जाईल.